**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ यांची शपथेवर जबानी</u>** .....

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की–

माझे नाव – रामकृष्ण पिलाजी मोहिते,
वय – ६७ वर्षे,
व्यवसाय – शेती,
राहणार – तुडिये, ता. चंदगड, जि. कोल्हापूर.

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र.०१ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. डी. चव्हाण यांचेमार्फत</u>** –

दिनांक ०६/०६/२०२० रोजी पोलिसांनी मला पंचनामा करण्यासाठी फिर्यादी व आरोपी यांच्या घरासमोर बोलावले होते. तिथे पोलिसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला. घटना ठिकाण मला पोलिसांनी व फिर्यादी भिकाजी पाटील यांनी दाखविले. तिथे पोलिसांनी मला पडलेला दगड दाखविला. तसेच मारहाण केलेला दगड पोलिसांनी माझ्या समक्ष जप्त केला. आता मला घटनास्थळ/जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी अनुक्रमांक १ वर सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.२२</u>** देण्यात येत आहे. जप्त दगड मला दाखविल्यास मी तो ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. एस. पाटील यांच्याकडून–</u>**

२. सदर जागेवर दगडाचा पंचनामा केला. त्यावेळी दुसरे पंच नंदु बाबाजी पाटील होते. नंदु पाटील यांस दुस–या कोणत्याही नावाने ओळखत नाहीत. त्यादिवशी कोणता वार होता हे माझ्या लक्षात नाही. मी घटनास्थळावर सकाळी ८.१५ वाजेच्या दरम्यान गेलो होतो. पंचनामा जागेवरच लिहीला. पंचनामा लिहीणा–या पोलिसाचे नाव मला माहित नाही. पंचनाम्यावर मी व नंदु पाटील याने सह्या केल्या होत्या. पंचनाम्यातील अक्षांश व रेखांश काय आहे हे मला माहित नाही. अक्षांश व रेखांश का लिहीले आहे हे मी सांगु शकत नाही. घटनास्थळाच्या चतु:सिमा मला सांगता येतील. घटनास्थळाच्या पुर्वेस– आरोपीचे घर, पश्चिमेला– भिकाजी पार्वतकर याचे घर आहे, दक्षिणेस– कल्लाप्पा पाटील यांची जमिन व उत्तरेस– पांडुरंग पाटील आहे. तिथे पोलिसांनी माझ्या दोन सह्या घेतल्या होत्या. सदर दगड किती वजनाचा होता हे मी सांगु शकत नाही. सदर दगडाची लांबी–रुंदी पोलिसांनी माझ्यासमक्ष

घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमाल दगड फिर्यादीने पोलिसांना दाखविला व दिला. पोलिसांनी मला माणुस पाठवुन बोलावुन घेतले होते. पोलिसांची व माझी ओळख नाही. मी ग्रामपंचायतमधील तंटामुक्ती समितीमध्ये होतो, त्यामुळे पोलिसांनी मला बोलावुन घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादीमध्ये कोणत्या कारणावरुन काय घडले होते याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे पोलिसांनी पंचनामा तयार केला व मी त्यावर सही केली.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2026.08.24 17:43:43 +0530

**ठिकाण – चंदगड** **( ए. एन. सरक )**

**दिनांक – २४/०८/२०२६** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, चंदगड.**